दिनांक :- ०६/०२/२०२४.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका 'ह' प्रभाग, कर विभागातील शिपाई योगेश माधवराव महाले व सेवानिवृत्त कामगार सूर्यभान नानाजी कर्डक यांना लाच स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतलेबाबत:-

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग / घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :- | विष्णू नगर पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| लोकसेवकाचे / खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | :- | १. श्री. योगेश माधवराव महाले, शिपाई, कल्याण डोंबिवली महानगरपालिका 'ह' प्रभाग, कर संकलन विभाग.<br>२. श्री. सूर्यभान नानाजी कर्डक, सेवानिवृत्त कामगार, कल्याण डोंबिवली महानगरपालिका 'ह' प्रभाग. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | १,०८,०००/- रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | तडजोडी अंती ५०,०००/- रुपये |
| थोडक्यात हकीकत | :- | यातील तक्रारदार हे इस्टेट कंन्सलटंट असून त्यांच्याकडे डोंबिवली (पश्चिम) येथील एका सोसायटीतील रहीवाशांनी त्यांचे फ्लॅटला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे 'ह' प्रभागचे कार्यालयातून मालमत्ता कर आकारणी करुन देण्याचे काम दिले होते. सदरचे काम करुन देण्याकरीता नमूद कार्यालयातील शिपाई योगेश महाले व सेवानिवृत्त कामगार सूर्यभान कर्डक हे लाचेची मागणी करत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीच्या अनु ंगाने दिनांक ०६/०२/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत तक्रारदार यांनी डोंबिवली (पश्चिम) येथील एका सोसायटीतील रहीवाशांनी त्यांचे फ्लॅटला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे 'ह' प्रभागचे कार्यालयातून मालमत्ता कर आकारणी करुन देण्याचे कामाकरीता शिपाई योगेश महाले व सेवानिवृत्त कामगार सूर्यभान कर्डक यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम १,०८,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे ला.प्र.वि., ठाणे विभागाने लागलीच आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान् लोकसेवक योगेश महाले यांनी सेवानिवृत्त कामगार सूर्यभान कर्डक यांचेसमक्ष उपस्थितीत तक्रारदार यांचेकडून मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता लोकसेवक व सेवानिवृत्त कामगार यांना रंगेहाथ पकडण्यात आले. |

मार्गदर्शन अधिकारी :- मा. श्री. सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
मा. श्री.महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
मा. श्री. सुधाकर सुराडकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

सपंर्क पत्ता - ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ - acbmaharastra@mahapolice.gov.in
Email - spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन - acbmaharastra.net
टोल फ्री नंबर - १०६४
दुरध्वनी क्रमांक - ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९, व्हॉटस्ॲप्स् क्रमांक - ९९३०९९७७००
दिनांक - ०६/०२/२०२४.

मा. सविनय सादर,

(विलास मते)
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे